# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** विकास योजना नागपूर (सुधारित)

**{नगररचना विभाग}** मौजा – वाठोडा, खसरा क्र. 9, 10, 11, 12, 13/1 मधील 3.75 हे.आर 1.18 हे.आर जागेवरील आरक्षण क्र. ME – 54 व EP – 100 अन्वये सार्वजनिक संस्था वापराखालील जागा आरक्षणातुन वगळुन वाणिज्य / रहिवास विभागात समाविष्ठ करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम – 37 अन्वये फेरबदल करण्याबाबत.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजना (सु) मध्ये मौजा – वाठोडा येथील खसरा क्र. ९ / १० / ११ / १२ / १३/१ मधील अर्जदाराच्या ३.७५ हेक्टर क्षेत्राची जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या ‘ वाठोडा हॉऊसिंग अकोमोडेशन स्किम ’ अंतर्गत असुन आरक्षण क्र.ME – ५४ ऑडोटोरीयम, ३६.०० मी. रूंद रस्ता, १८.०० मी. रूंद रस्ता १२.०० मी. रूंद रस्ता, EP – १०० अन्वये सार्वजनिक संस्था वापर व उर्वरीत जागा निवासी वापराकरीता प्रस्तावित आहे. सदर जागा २२ वर्षापासुन आरक्षित असल्याने जागेचा विकास करता आलेले नसल्याने आर्थिक नुकसान झालेले आहे. सदर आरक्षित जागा संपादन करून मोबदला दिलेला नाही. त्यामुळे या जागेच्या ३.७५ हे.आर क्षेत्रापैकी१.१८ हे.आर क्षेत्राच्या जागेवरील आरक्षणे वगळुन सदर जमीन वाणिज्य व रहिवास विभागात समाविष्ठ करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम – ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेची विनंती श्री. मनोहर नारायणराव ढोबळे यांनी दि. १६.०३.२०२३ रोजी नागपूर महानगरपालिकेस केलेली आहे. अर्जदाराची जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या नियोजन प्राधिकरण क्षेत्रात असल्याने सदर आरक्षित जागेसंदर्भात फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणेच्या अनुषंगाने नागपूर सुधार प्रन्यास कडुन पत्र क्र. २२८, दि. १५.०५.२०२३ अन्वये नाहरकत अपेक्षिलेले होते. त्यानुसार नागपूर सुधार प्रन्यासने शासनाकडील निर्देश क्र. टिपीएस – २४१६ / प्र.क्र. १६ / नवि – ९, दि. २०.०४.२०१६ रोजीच्या निर्देशानुसार अधिनियमाच्या कलम – ३७ (२) ची अधिसुचना निर्गमित करतांना बाजारमुल्य दर तक्त्यातील दराच्या ५% प्रमाणे येणाऱ्या रक्कमेपैकी ५० % रक्कम नागपूर सुधार प्रन्यास प्रन्यासकडे व ५० % शासनास जमा करणे आवश्यक राहील या अटीस अधीन राहुन विषयांकित जागेचा फेरबदल प्रस्ताव नागपूर महानगरपालिकेमार्फत कार्यान्वीत करणेस हरकत नसल्याचे त्यांचेकडील पत्र क्र. १९५४, दि. ३१.०५.२०२३ अन्वये कळविलेले आहे. त्यानुषंगाने विषयांकित जागेचे स्थानमान व आजुबाजुला झालेला विकास विचारात घेता विषयांकित जागेवरील विकास योजनेतील रस्ते कायम ठेऊन आरक्षण भागश: आणि सार्वजनिक संस्था वापराखालील जागा वगळुन रहिवास विभागास समाविष्ठ करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना विभाग अधिनियम १९६६ चे कलम – ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव कार्यान्वीत करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

१) नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस – २४९६ – २६४३ - प्र.क्र. ३००(अ) -९७- नवि-९, दि.०७ जानेवारी २००० अन्वये भागश: मंजुर झाली असुन ती दि. ०१ मार्च २००० पासुन अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर. -२००-नवि-९, दि. १०.०९.२००१ अन्वये मंजुर झाली असुन तीदि. २१.०९.२००१ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६/नवि-९, दि. २७ फेब्रुवारी २००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्राअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरीतनागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणुन घोषित केलेले होते व तथापि शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टिपीएस - २४१९ – १४९९ - प्र.क्र.-१५४ – २०१९ – नवि-९,दि. २७ ऑगस्ट २०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता सुध्दा नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणुन घोषित केलेले होते. तसेच शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस – २४१९ – १४९९-प्र.क्र. – १५४ (भाग-१)/२०१९/नवि-९,दि.

०९.०४.२०२१ अन्वये नागपूर शहरातील ७ योजनेतील स्मार्ट सिटी योजने अंतर्गत नगर रचना योजनेखालील क्षेत्र वगळुन त्याकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण म्हणुन नियुक्ती केलेली आहे. विषयांकित जागेकरीता नागपूर सुधार प्रन्यास हे नियोजन प्राधिकरण आहे.

२) नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेत मौजा — वाठोडा येथील खसरा क्र. ९ / १० / ११ / १२ / १३ / १ मधील अर्जदाराची जागा आरक्षण क्र. ME — ५४ ऑडोटोरीयम (भागशः), ३६.०० मी. रूंद रिंग रोड, १२.०० मी. रूंद व १८.०० मी. रूंद विकास योजना रस्ता, EP — १०० सार्वजनिक संस्था भागशः, बाधीत होत असुन उर्वरीत जागा रहिवास विभागात समाविष्ठ आहे. विषयांकित जागा विदयमान ३६.०० मी. रूंद रस्त्याने विभाजीत झालेली आहे. विषयांकित जागेच्या परिसरात गुंठेवारी पध्दतीने विकास झालेला असुन विषयांकित जागा खुल्या स्वरूपात आहे. सदर जागेचे स्थानमान व जागेस ३६.०० मी. रूंद रिंग रोडच्या पोच असल्याने जागेस रहिवास / वाणिज्य क्षमता प्राप्त आहे. सदर जागा नागपूर शहराच्या मंजुर विकास योजना (सु) मध्ये दाटीवाटींच्या क्षेत्राबाहेर स्थित आहे. नागपूर शहराच्या मंजुर विकास योजना सुधारित मध्ये विषयांकित जागेवरील आरक्षण क्र. ME — ५४ ऑडोटोरीयम करीता राखीव जागेचे क्षेत्र २.७६४८ हे. एवढे असुन सदर आरक्षणाचे समुचित प्राधिकरण नागपूर सुधार प्रन्यास / खाजगी संस्था म्हणुन आहे. तसेच EP — १०० अन्वये सार्वजनिक संस्था वापर मंजुर विकास योजनेत प्रस्तावित आहे. विषयांकित जागा मौजा — भांडेवाडी कम्पोस्ट डेपोपासुन ५००.०० मी. अंतरा बाहेर स्थित आहे.

३) विषयांकित जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या नियोजन प्राधिकरण क्षेत्रात येत असल्याने अर्जदाराने महानगरपालिकेकडे मंजुर विकास योजनेतील आरक्षित जागा वगळुन वाणिज्य / रहिवास विभागात समाविष्ठ करणेकरीता अधिनियमाच्या कलम — ३७ अन्वये फेरबदल करणेकरीता विनंती केल्याने व आरक्षण क्र. ME — ५४ ऑडोटोरीयम करीता समुचित प्राधिकरण नागपूर सुधार प्रन्यास / खाजगी संस्था असल्याने विषयांकित जागेच्या फेरबदल प्रस्तावाच्या अनुषंगाने हरकत आहे किंवा कसे याबाबत संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये विचारणा करणेत आलेली होती. त्यानुसार नागपूर सुधार प्रन्यासने संदर्भीय पत्र क्र. ३ अन्वये हरकत नसल्याचे कळविलेले आहे.

४) नागपूर सुधार प्रन्यासकडील संदर्भीय पत्र क्र. ३ चे अवलोकन केले असता, पोलीस विभागाच्या विनंतीनुसार सुधारीत मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. ME — ५४ ऑडोटोरीयम (क्षेत्र ४.१६ एकर) व EP — १०० सार्वजनिक संस्था क्षेत्र ३.८३ एकर असे एकुण ७.९९ एकर जागा या आरक्षणातुन वगळुन पोलीस आस्थापना या करीता प्रस्तावित करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम — ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव नागपूर सुधार प्रन्यासने कार्यान्वीत करून शासनास पत्र क्र. अधि अभि / रचना / १२८५, दि. २७.०७.२००७अन्वये मंजुरीसाठी सादर केलेला आहे. तथापि, सदर फेरबदल प्रस्तावास शसानाची मंजुरी अदयाप अप्राप्त आहे. नागपूर सुधार प्रन्यासने कार्यान्वीत केलेल्या फेरबदल प्रस्तावात विषयांकित जागेचा समावेश होता.

५) नागपूर सुधार प्रन्यासने पत्र क्र. १२८५अधि अभि / रचना /,दि. २७.०७.२००७अन्वये शासनास मंजुरीस्तव सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करता ऑडोटोरीयमचे आरक्षण वगळणेबाबतची कारणमिमांसा पाहता प्रस्तावित उक्त आरक्षण क्र. ME — ५४ ऑडोटोरीयमच्या आरक्षित जागेपासुन जवळच नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीच्या मौजा — हिवरी येथील खसरा क्र. १६ वरील जागेवर १००० आसन क्षमतेच्या ऑडोटोरीयमचे बांधकाम नागपूर सुधार प्रन्यासने हाती घेतले असुन बांधकाम प्रगतीपथावर असल्याचे प्रस्तावात नमुद केलेले आहे. त्यानुसार याबाबतची खात्री केली असता, सदर जागेवर नागपूर सुधार प्रन्यासने ऑडोटोरीयमचे बांधकाम केलेले असल्याचे स्थळनिरीक्षणाअंती दिसुन आले. तेव्हा त्या परिसरात ऑडोटोरीयमची सुविधा उपलब्ध असल्याचे दिसुन येते.

६) वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेता व विषयांकित जागेच स्थानमान व सदर जमीनीस असलेली विकास क्षमता विचारात घेता अर्जदाराच्या विनंतीनुसार मौजा — वाठोडा येथील खसरा क्र. ९ / १० / ११ / १२ / १३ / १ मधील३.७५ हे. आर पैकी मंजुर विकास योजनेतील प्रस्तावित विकास योजना रस्ते कायम ठेऊन आरक्षण क्र.ME — ५४ ऑडोटोरीयम (भागशः) व EP — १०० अन्वये प्रस्तावित सार्वजनिक संस्थेकरीता प्रस्तावित (भागशः) १.१८ हे. क्षेत्राची विकास योजना भाग नकाशात

दर्शविल्यानुसारची जागा उक्त आरक्षणातुन / विभागातुन वगळुन रहिवास विभागात समाविष्ठ करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम – ३७ अन्वये मंजुर विकास योजना (सु) मध्ये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणे आवश्यक आहे. त्याकरीता प्रशासकीय ठराव पारीत करून फेरबदल प्रस्तावाची पुढील वैधानिक कार्यवाही पुर्ण करणे आवश्यक आहे.

७) विषयांकित जागेचा फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणेस मान्यता असल्यास प्रशासकीय ठराव पारीत करून फेरबदल प्रकरणी पुढील वैधानिक कार्यवाही करता येईल. उक्त फेरबदल प्रस्तावानुषंगाने पारीत करणेत आलेल्या ठरावानुसार त्याबाबतची सुचना मराठी / इंग्रजी वृत्तपत्रात, महाराष्ट्र शासन राजपत्रात नागरीकांच्या सुचना / हरकती मागविणेकरीता प्रसिध्द करणे, विहीत कालावधीत प्राप्त सुचना / हरकतधारकांना सुनावणी देऊन व वैधानिक कार्यवाही पुर्ण करून सदर फेरबदलाचा प्रस्ताव मंजुरीस्तव शासनास सादर करणेची कार्यवाही करता येईल.

करीता विषयांकित जागेच्या फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणेच्यामान्यतेसह प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करणेचा प्रश्न विचारात घेणे.

(सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.)

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 429/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 20/06/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालक, नगररचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार विकास योजना नागपूर (सुधारित) मौजा – वाठोडा, खसरा क्र. 9, 10, 11, 12, 13/1 मधील 3.75 हे.आर 1.18 हे.आर जागेवरील आरक्षण क्र. ME – 54 व EP – 100 अन्वये सार्वजनिक संस्था वापराखालील जागा आरक्षणातुन वगळुन वाणिज्य / रहिवास विभागात समाविष्ठ करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम – 37 अन्वये फेरबदल करण्याबाबत.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजना (सु) मध्ये मौजा – वाठोडा येथील खसरा क्र. ९ / १० / ११ / १२ / १३/१ मधील अर्जदाराच्या ३.७५ हेक्टर क्षेत्राची जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या ‘ वाठोडा हॉऊसिंग अकोमोडेशन स्किम ’ अंतर्गत असुन आरक्षण क्र.ME – ५४ ऑडोटोरीयम, ३६.०० मी. रूंद रस्ता, १८.०० मी. रूंद रस्ता १२.०० मी. रूंद रस्ता, EP – १०० अन्वये सार्वजनिक संस्था वापर व उर्वरीत जागा निवासी वापराकरीता प्रस्तावित आहे. सदर जागा २२ वर्षापासुन आरक्षित असल्याने जागेचा विकास करता आलेले नसल्याने आर्थिक नुकसान झालेले आहे. सदर आरक्षित जागा संपादन करून मोबदला दिलेला नाही. त्यामुळे या जागेच्या ३.७५ हे.आर क्षेत्रापैकी१.१८ हे.आर क्षेत्राच्या जागेवरील आरक्षणे वगळुन सदर जमीन वाणिज्य व रहिवास विभागात समाविष्ठ करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम – ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेची विनंती श्री. मनोहर नारायणराव ढोबळे यांनी दि. १६.०३.२०२३ रोजी नागपूर महानगरपालिकेस केलेली आहे. अर्जदाराची जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या नियोजन प्राधिकरण क्षेत्रात असल्याने सदर आरक्षित जागेसंदर्भात फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणेच्या अनुषंगाने नागपूर सुधार प्रन्यास कडुन पत्र क्र. २२८, दि. १५.०५.२०२३ अन्वये नाहरकत अपेक्षिलेले होते. त्यानुसार नागपूर सुधार प्रन्यासने शासनाकडील निर्देश क्र. टिपीएस – २४१६ / प्र.क्र. १६ / नवि – ९, दि. २०.०४.२०१६ रोजीच्या निर्देशानुसार अधिनियमाच्या कलम – ३७ (२) ची अधिसुचना निर्गमित करतांना बाजारमुल्य दर तक्त्यातील दराच्या ५% प्रमाणे येणाऱ्या रक्कमेपैकी ५० % रक्कम नागपूर सुधार प्रन्यास प्रन्यासकडे व ५० % शासनास जमा करणे आवश्यक राहील या अटीस अधीन राहुन विषयांकित जागेचा फेरबदल प्रस्ताव नागपूर महानगरपालिकेमार्फत कार्यान्वीत करणेस हरकत नसल्याचे त्यांचेकडील पत्र क्र. १९५४, दि. ३१.०५.२०२३ अन्वये कळविलेले आहे. त्यानुषंगाने विषयांकित जागेचे स्थानमान व आजुबाजुला झालेला विकास विचारात घेता विषयांकित जागेवरील विकास योजनेतील रस्ते कायम ठेऊन आरक्षण भागश: आणि सार्वजनिक संस्था

वापराखालील जागा वगळुन रहिवास विभागास समाविष्ठ करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना विभाग अधिनियम १९६६ चे कलम – ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव कार्यान्वीत करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

१) नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस – २४९६ – २६४३ - प्र.क्र. ३००(अ) -९७- नवि-९, दि.०७ जानेवारी २००० अन्वये भागश: मंजुर झाली असुन ती दि. ०१ मार्च २००० पासुन अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर. -२००-नवि-९, दि. १०.०९.२००१ अन्वये मंजुर झाली असुन तीदि. २१.०९.२००१ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६/नवि-९, दि. २७ फेब्रुवारी २००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्राअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरीतनागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणुन घोषित केलेले होते व तथापि शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टिपीएस - २४१९ – १४९९ - प्र.क्र.-१५४ – २०१९ – नवि-९,दि. २७ ऑगस्ट २०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता सुध्दा नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणुन घोषित केलेले होते. तसेच शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस – २४१९ – १४९९-प्र.क्र. – १५४ (भाग-१)/२०१९/नवि-९,दि. ०९.०४.२०२१ अन्वये नागपूर शहरातील ७ योजनेतील स्मार्ट सिटी योजने अंतर्गत नगर रचना योजनेखालील क्षेत्र वगळुन त्याकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण म्हणुन नियुक्ती केलेली आहे. विषयांकित जागेकरीता नागपूर सुधार प्रन्यास हे नियोजन प्राधिकरण आहे.

२) नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेत मौजा – वाठोडा येथील खसरा क्र. ९ / १० / ११ / १२ / १३ / १ मधील अर्जदाराची जागा आरक्षण क्र. ME – ५४ ऑडोटोरीयम (भागश:), ३६.०० मी. रूंद रिंग रोड, १२.०० मी. रूंद व १८.०० मी. रूंद विकास योजना रस्ता, EP – १०० सार्वजनिक संस्था भागश:, बाधीत होत असुन उर्वरीत जागा रहिवास विभागात समाविष्ठ आहे. विषयांकित जागा विदयमान ३६.०० मी. रूंद रस्त्याने विभाजीत झालेली आहे. विषयांकित जागेच्या परिसरात गुंठेवारी पध्दतीने विकास झालेला असुन विषयांकित जागा खुल्या स्वरूपात आहे. सदर जागेचे स्थानमान व जागेस ३६.०० मी. रूंद रिंग रोडच्या पोच असल्याने जागेस रहिवास / वाणिज्य क्षमता प्राप्त आहे. सदर जागा नागपूर शहराच्या मंजुर विकास योजना (सु) मध्ये दाटीवाटींच्या क्षेत्राबाहेर स्थित आहे. नागपूर शहराच्या मंजुर विकास योजना सुधारित मध्ये विषयांकित जागेवरील आरक्षण क्र. ME – ५४ ऑडोटोरीयम करीता राखीव जागेचे क्षेत्र २.७६४८ हे. एवढे असुन सदर आरक्षणाचे समुचित प्राधिकरण नागपूर सुधार प्रन्यास / खाजगी संस्था म्हणुन आहे. तसेच EP – १०० अन्वये सार्वजनिक संस्था वापर मंजुर विकास योजनेत प्रस्तावित आहे. विषयांकित जागा मौजा – भांडेवाडी कम्पोस्ट डेपोपासुन ५००.०० मी. अंतरा बाहेर स्थित आहे.

३) विषयांकित जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या नियोजन प्राधिकरण क्षेत्रात येत असल्याने अर्जदाराने महानगरपालिकेकडे मंजुर विकास योजनेतील आरक्षित जागा वगळुन वाणिज्य / रहिवास विभागात समाविष्ठ करणेकरीता अधिनियमाच्या कलम – ३७ अन्वये फेरबदल करणेकरीता विनंती केल्याने व आरक्षण क्र. ME – ५४ ऑडोटोरीयम करीता समुचित प्राधिकरण नागपूर सुधार प्रन्यास / खाजगी संस्था असल्याने विषयांकित जागेच्या फेरबदल प्रस्तावाच्या अनुषंगाने हरकत आहे किंवा कसे याबाबत संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये विचारणा करणेत आलेली होती. त्यानुसार नागपूर सुधार प्रन्यासने संदर्भीय पत्र क्र. ३ अन्वये हरकत नसल्याचे कळविलेले आहे.

४) नागपूर सुधार प्रन्यासकडील संदर्भीय पत्र क्र. ३ चे अवलोकन केले असता, पोलीस विभागाच्या विनंतीनुसार सुधारीत मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. ME – ५४ ऑडोटोरीयम (क्षेत्र ४.१६ एकर) व EP – १०० सार्वजनिक संस्था क्षेत्र ३.८३ एकर असे एकुण ७.९९ एकर जागा या आरक्षणातुन वगळुन पोलीस आस्थापना या करीता प्रस्तावित करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम – ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव नागपूर सुधार प्रन्यासने कार्यान्वीत करून शासनास पत्र क्र. अधि अभि / रचना / १२८५, दि. २७.०७.२००७अन्वये मंजुरीसाठी सादर केलेला आहे. तथापि, सदर

फेरबदल प्रस्तावास शसानाची मंजुरी अदयाप अप्राप्त आहे. नागपूर सुधार प्रन्यासने कार्यान्वीत केलेल्या फेरबदल प्रस्तावात विषयांकित जागेचा समावेश होता.

५) नागपूर सुधार प्रन्यासने पत्र क्र. १२८५अधि अभि / रचना /,दि. २७.०७.२००७अन्वये शासनास मंजुरीस्तव सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करता ऑडोटोरीयमचे आरक्षण वगळणेबाबतची कारणमिमांसा पाहता प्रस्तावित उक्त आरक्षण क्र. ME – ५४ ऑडोटोरीयमच्या आरक्षित जागेपासुन जवळच नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीच्या मौजा – हिवरी येथील खसरा क्र. १६ वरील जागेवर १००० आसन क्षमतेच्या ऑडोटोरीयमचे बांधकाम नागपूर सुधार प्रन्यासने हाती घेतले असुन बांधकाम प्रगतीपथावर असल्याचे प्रस्तावात नमुद केलेले आहे. त्यानुसार याबाबतची खात्री केली असता, सदर जागेवर नागपूर सुधार प्रन्यासने ऑडोटोरीयमचे बांधकाम केलेले असल्याचे स्थळनिरीक्षणाअंती दिसुन आले. तेव्हा त्या परिसरात ऑडोटोरीयमची सुविधा उपलब्ध असल्याचे दिसुन येते.

६) वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेता व विषयांकित जागेच स्थानमान व सदर जमीनीस असलेली विकास क्षमता विचारात घेता अर्जदाराच्या विनंतीनुसार मौजा – वाठोडा येथील खसरा क्र. ९ / १० / ११ / १२ / १३ / १ मधील३.७५ हे. आर पैकी मंजुर विकास योजनेतील प्रस्तावित विकास योजना रस्ते कायम ठेऊन आरक्षण क्र.ME – ५४ ऑडोटोरीयम (भागशः) व EP – १०० अन्वये प्रस्तावित सार्वजनिक संस्थेकरीता प्रस्तावित (भागशः) १.१८ हे. क्षेत्राची विकास योजना भाग नकाशात दर्शविल्यानुसारची जागा उक्त आरक्षणातुन / विभागातुन वगळुन रहिवास विभागात समाविष्ठ करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम – ३७ अन्वये मंजुर विकास योजना (सु) मध्ये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणे आवश्यक आहे. त्याकरीता प्रशासकीय ठराव पारीत करून फेरबदल प्रस्तावाची पुढील वैधानिक कार्यवाही पुर्ण करणे आवश्यक आहे.

७) विषयांकित जागेचा फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणेस मान्यता असल्यास प्रशासकीय ठराव पारीत करून फेरबदल प्रकरणी पुढील वैधानिक कार्यवाही करता येईल. उक्त फेरबदल प्रस्तावानुषंगाने पारीत करणेत आलेल्या ठरावानुसार त्याबाबतची सुचना मराठी / इंग्रजी वृत्तपत्रात, महाराष्ट्र शासन राजपत्रात नागरीकांच्या सुचना / हरकती मागविणेकरीता प्रसिध्द करणे, विहीत कालावधीत प्राप्त सुचना / हरकतधारकांना सुनावणी देऊन व वैधानिक कार्यवाही पुर्ण करून सदर फेरबदलाचा प्रस्ताव मंजुरीस्तव शासनास सादर करणेची कार्यवाही करता येईल.

करीता विषयांकित जागेच्या फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणेच्यामान्यतेसह प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**

**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**

**प्रशासक**

**नागपूर महानगरपालिका, नागपूर**